# - प्रेस नोट -

दि. २५/०७/२०२६

## पवई पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि. २३/०७/२०२६ रोजी १०.३० वा. च्या सुमारास फिर्यादी दानिश युनुस खान वय-२८ वर्षे, धंदा- नोकरी, रा.ठी. पवई, मुंबई. हे बेस्ट सर्कलचे जवळ, फिल्टरपाडा, पठाणवाडी, पवई, मुंबई येथे आईस्क्रीम खात उभे असताना अटक आरोपी पुरूष वय- ३७ वर्षे याने फिर्यादीच्या काकांनी अटक आरोपी व अटक आरोपीचा मित्र यांच्या विरूद्ध केलेल्या पोलीस तक्रारीमुळे अटक आरोपीस व त्याच्या घरातल्यांना त्याचा त्रास होत आहे हे फिर्यादीस सांगुन, फिर्यादी यांना हाताने धक्का देऊन शिवीगाळ करून त्याचेजवळील चाकुने फिर्यादीस जिवे ठार मारण्याचे उद्देशाने गळयावर मारण्यास उगारला असता तो वार फिर्यादींनी हुकवुन सदर ठिकाणाहुन निघुन जाण्याचा प्रयत्न केला असता तो वार फिर्यादी यांच्या पाठीवर लागुन त्यांना जखमी केले. तसेच फिर्यादी यांच्या मदतीकरीता आलेल्या लोकांना अटक आरोपी याने त्याचे हातातील चाकु हा हवेमध्ये फिरवुन जिवे ठार मारण्याची धमकी दिली व परिसरात दहशत निर्माण केली. तेव्हा फिर्यादी हे घाबरून आपला जिव वाचवुन घराच्या दिशेने पळाले असता अटक आरोपी चाकु घेऊन फिर्यादी यांच्या पाठोपाठ त्यांच्या घराच्या दरवाजासमोर येऊन फिर्यादी यांची काकु व बहीण यांचेसमक्ष हातातील चाकु दाखवुन फिर्यादी यांच्या बहीणीला फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी दिली म्हणून फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.२४/०७/२०२६ रोजी गु.र.क्र. ७९३/२६, कलम १०९(१),३५२,३५१(३) बीएनएस २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

---------------------